पहा : 1. मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्गमीत केलेले पत्र B(W)-2018 of 2019/539/9745/, dated 23.03.2020
2. मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्गमीत केलेले पत्र B(Gen)-5601/2020/, dated 23.04.2020

# जाहिरात

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील वरील संदर्भीय पत्र क्र. 1 नुसार जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद येथे स्थापन होणारे बालकांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा (POCSO) अंतर्गत चालणारी प्रकरणे जलदगतीने चालविण्यासाठी नवनिर्मित विशेष न्यायालयासाठी सेवानिवृत्त कर्मचारी यांचेकडुन खालील पदासाठी या कार्यालयाद्वारे दिनांक 27 मार्च, 2020 रोजी उस्मानाबाद जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळावर तसेच तालुका न्यायालयाचे संकेतस्थळावर व न्यायालयाचे नोटीस बोर्डवर जाहिरात डकवून जाहिरात प्रसिध्द करण्यांत आली होती व अर्ज दाखल करणेसाठी जाहिरात प्रसिध्द झालेपासुन पंधरा दिवसाची मुदत देण्यांत आली होती. परंतु सदरचे जाहिरातीचे उत्तरादाखल फक्त सहाय्यक अधिक्षक यांनी वरिष्ठ लिपीक या पदासाठी नेमणुक होणेस या न्यायालयास अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे या न्यायालयाद्वारे पुनश्च: एकदा उस्मानाबाद जिल्हा न्यायालयाचे आस्थपनेवरून तसेच उस्मानाबाद जिल्हा न्यायालयाचे आस्थापनेखालील सर्व न्यायालयातून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांचेकडुन खालील पदे एक वर्षाचे कालावधीसाठी किंवा पुढील आदेशापर्यंत भरणेबाबत अर्ज मागविण्यांत येत आहेत.

अधिक्षक, लघुलेखक उच्च श्रेणी, वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक, शिपाई यांचे मधून अधिक्षक 1 पद, लघुलेखक उच्च श्रेणी 1 पद, वरिष्ठ लिपीक 1 पद, कनिष्ठ लिपीक 2 पदे, शिपाई-2 पदे, ही पदे भरावयाची आहेत. त्यावरून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त कर्मचारी यांना कळविण्यात येते की, इच्छुक उमेदवारांनी ते ज्या पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत त्या पदासाठी ते बालकांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा (POCSO) अंतर्गत चालणारी प्रकरणे जलदगतीने चालविण्यासाठी नवनिर्मित विशेष न्यायालयासाठी काम करण्यास इच्छुक असल्यास मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद यांचे नावे सदरची जाहिरात प्रसिध्द झालेपासून दिनांक 10 मे, 2020 पर्यंत अर्ज सादर करावेत. सदरचे अर्जामध्ये पात्र उमेदवारास नियुक्ती देण्याचे सर्वाधिकार प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद यांना राहितील.

सदरच्या पदासाठी मा. शासनाकडुन तसेच मा. उच्च न्यायालयाकडुन वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या निर्देशानुसार वेतन व भत्ते लागू राहतील.

सदरची जाहिरात ही मा. जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांचे संकेतस्थळ districts.ecourts.gov.in/osmanabad वर पाहता येईल.

प्रस्तुतचे अर्ज हे मा. जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांचे इमेल आयडी **mahosmdc@mhstate.nic.in** वर स्विकारले जातील.

जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद. []

[]

दिनांक :- 27 एप्रिल, 2020 []

20.4.2020

**( श्रीमती एस.एम. शिंदे )**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद.

जा.क्र.काव्यवि/प्रशा/ 9054 /2020
दिनांक : 27 एप्रिल 2020

**याची प्रत माहिती आणि पुढीलयोग्य त्या कार्यवाही करिता अग्रेषित**

01) जिल्हा न्यायाधीश 1 **उस्मानाबाद/उमरगा/भूम**

02) न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, **उस्मानाबाद.**

03) दिवाणी न्यायाधीश व.स्तर, **उस्मानाबाद/उमरगा/भूम/परंडा.**

04) मुख्य न्यायदंडाधिकारी, **उस्मानाबाद.**

05) सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, **उस्मानाबाद.**

**06**) दिवाणी न्यायाधीश क.स्तर, **तुळजापूर / कळंब / वाशी / लोहारा.**

07) सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरगा / भूम / परंडा

08) सर्व न्यायालयाचे नोटीस बोर्डवर डकविण्यासाठी तसेच विधीज्ञ मंडळाच्या नोटीस बोर्डवर डकविण्यासाठी

09) कार्यालयीन संचिका.

<u>याची एक प्रत :</u>

सहाय्यक अधिक्षक, (रो.वि.ले.)जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांना देवून सूचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक न्यायालयातील सर्व कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन द्यावे.

# PROFORMA

**For the post of Superintendent, Stenographer High Grade (Grade-2), Senior Clerk, Junior Clerk and Peon on contract basis from retired Judicial Employee for Exclusive/Dedicated POCSO Court**

| | | |
|---|---|---|
| 1 | Affix recent self attested passport sixe photograph | |
| 2 | Full name (beginning with surname) Residential address with Telephone/Mobile Nos. | |
| 3 | Posting and place at the time of retirement. | |
| 4 | Designation at the time of retirement. | |
| 5 | Date of Birth | |
| 6 | Date of retirement. | |
| 7 | Place of family home. | |
| 8 | Whether meedical fitness certificate is attached ? | |

Signature of Applicant